जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक ३५०

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०६/०२/२०२४
## दि.०५/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ५१/२०२४,भादविक ३९२,३९७,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), क्रिमिनल लॉ अमेंडमेड ॲक्ट कलम ३ व ७,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-१८ वर्षे,रा.विद्यानगर,टिंगरेनगर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०२/२०२४ रोजी संध्याकाळी १९/५० वा.शॉप क्र.०३,निदमय बिअर शॉपी, टिंगरे नगर लेन क्र.०६,विश्रांतवाडी,पुणे या दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे शॉप क्र.०३,निदमय बिअर शॉप,टिंगरेनगर लेन क्र.०६,विश्रांतवाडी,पुणे येथे काम करीत आहे. ते सदर बिअर शॉप मध्ये काम करीत असताना त्यांचे मालकाच्या ओळखीचे यापुर्वी उधारीवर बिअर घेवुन गेलेले यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना उधारीवर बिअरची मागणी करु लागले,त्यावेळी फिर्यादी यांनी शॉप मध्ये मालक नसल्याने उधार बिअर देण्यास नकार दिल्याचे कारणावरून सदर इसमांनी त्यांचे हातातील धारधार हत्यार फिर्यादीच्या गळ्यावर लावुन त्यांना जीवे मारण्याची धमकी देवुन,हाताने मारहाण केली. तसेच बिअर शॉप मधील ९३०/- रुपये बीअरच्या कॅण्ड व बॉटल जबरदस्तीने घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. माळी ९८२३७१७०८० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे १०३/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,३३७,३३८,मोटर वाहन कायदा कलम १८४,११९/१७७ १३४ |
| **फिर्यादी** | मनोहर नरवाडे,वय-२२,वर्षे,रा.मायकर मळा,धायरी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात वाहनावरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०२/२०२४ रोजी सकाळी ११/३० वा. तुळापूर रोडवर आर्मासेल कंपनीचे समोर लोणीकंद,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ पंडित हरिभाऊ नरवाडे,वय-२७ वर्ष,रा.लोणीकंद,ता.हवेली,जि.पुणे हा त्याचे कंपनीतुन सुट्टी झाल्यानंतर पायी चालत जात असताना,यातील नमुद अज्ञात वाहना वरील चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. राहुल कोळपे ९६५७२६१०१० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ११६/२०२४,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | विशाल जाधव,वय-२१ वर्षे,रा.शिवनेरीनगर,कोंढवा-खुर्द,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | रुषिकेश राजेंद्र कुंभार,वय-२३,रा.साई पार्क,त्रिमुर्ती चौक,आंबेगाव-पठार,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे ऑक्टोबर २०२३ ते दि.०५/०२/२०२४ रोजीचे कालावधीत इन्स्टाकार्ट सर्व्हीसेस प्रायव्हेट लिमिटेड,दत्त दिगंबर सहकारी वाहतूक संस्था लिमि.धनकवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे इन्स्टाकार्ट प्रायव्हेट लिमि.दत्त दिगंबर वाहतुक संघटना येथील ग्राऊंड फलोअर धनकवडी,पुणे येथील कंपनी मधील १०,१४,०३९/- रुपये किंचे एकुण २८ मोबाईल फोन हे फिर्यादी यांचे ऑफीस मधील नमुद डिलीव्हरी बॉय याने चोरी करून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संजय नरळे ९६६५४४८७७१ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४८/२०२४,भादविक ३७९,४२७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२ वर्षे,रा.खराडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०२/२०२४ रोजी दुपारी १२/०० वा.ते ३/०० वा.चे दरम्यान अप्सरा टॉकीज समोरील गेट जवळ,गुलटेकडी पुणे येथील पार्कींग मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांची बिझनेस पार्टनर हिचेसह व्यवसायाचे निमीत्ताने अप्सरा टॉकीज जवळ असणाऱ्या टु ब्रदर्स या शॉप मध्ये खरेदी करण्याकरीता येवुन त्यांची कार अप्सरा टॉकीजचे गेट समोर पार्क केली असताना,कोणीतरी अज्ञात चोरटयाने,फिर्यादी यांचे कारचे पाठीमागील दरवाज्याची काच फोडुन कारचे मागील सीटवर ठेवलेली पिवळया रंगाची पर्स व त्यामधील सोन्याचे दागिने,बँकेचे एटीएम व क्रेडीट कार्ड,ॲप्पल कंपनीचे हेडफोन,इतर महत्वाची कागदपत्रे व ३०,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण १,२०,०००/- रु किचा ऐवज चोरी करुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, खोमणे ०२०/२४४५२७६९ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५९/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५३ वर्षे,रा.वाळकेश्वर,मुंबई |
| **आरोपीत** | अज्ञात महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०२/२०२४ रोजी १७/१५ वा.विश्रांतवाडी ते रामवाडी,पुणे येथे पीएमपीएमएल बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया विश्रांतवाडी ते रामवाडी,पुणे असा मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात महिला हिने बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील मोठया पर्स मध्ये असलेल्या छोटया पर्स मधील १,३६,०००/- रु किचे सोन्याचे मंगळसुत्र,अंगठी व इतर महत्वाची कागदपत्रे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रदिप सुर्वे ८६०५३३३४३३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**